मार्गदर्शक पुस्तिका क्र.1

(मॅन्युअल – I)

कार्यालयाचा तपशील, कामकाज व कर्तव्ये

## कार्यालयाचा तपशील

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार महापलिकेचे प्रशासनाच्या सोयीसाठी 24 विभाग कार्यालयात विभाजन करण्यात आले. पूर्व उपनगरातील सहाविभागापैकी मुंलुंड टीविभाग हा एक विभाग आहे. या विभागाचा तपशील पुढीलप्रमाणे

`टी`विभाग कार्यालयाचा पत्ता –

टी विभाग कार्यालय

बृहन्मुंबई महानगरपालिका

लाला देवीदयाळ मार्ग,

मुलुंड(पश्चिम),

मुंबई -400080,

दूरध्वनी क्रंमांक – 25645289-91

फॅक्स क्रमांक  - 25624925

ई मेल - asstcom.ward.t@mcgm.gov.in

विभाग कार्यालयाच्या सीमारेषा पुढीलप्रमाणे

विभागाची सीमा

| | |
|---|---|
| उत्तर | मुलुंड चेक नाका (आनेद नगर) पूर्व द्रुतगती मार्ग |
| दक्षिण | गोरेगांव मुलुंड लिंक रोड, ठाणे खाडी ते भांडूप कॉम्पलेक्स विहार |
| पूर्व | हरि ओम नगर ते ऐरोली पूलापर्यंत |
| पश्चिम | संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची पूर्व बाजू. |

विभाग कार्यालयाचा प्रशासकिय प्रमुख हे सहाय्यक आयुक्त असून त्यांचे कार्यालय उपरोक्त पत्यावरील पहिल्या मजल्यावर स्थित आहे.

सहाय्यक आयुक्तांच्या अधिपत्याखाली कार्यरत अणा-या खातेपुमुखांचा तक्ता सोबत जोडला आहे. धोरणात्मक बाबीसंदर्भात तसेच कामकाजासंदर्भात तसेच कामकाजासंदर्भात महत्वाच्या निर्णयासाठी महापालिका आयुक्त/अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे)/परिमंडळ उप आयुक्त अशी प्रशासन साखळी आहे. सहाय्यक आयुक्तांची दर सोमवारी व शुक्रवारी दु.3 ते 4 ही वेळ नागरिकांच्या भेटीसाठी राखून ठेवलेली असून त्यावेळेत नागरिकांच्या भेटीसाठी राखून ठेवलेली असून त्यावेळेत नागरिक त्यांना भेटून आपली गा-हाणी/तक्रारी/सूचना मांडू शकतात.

प्राशासनाच्या सोयासाठी उप आयुक्त पातळीवर महापालिकेची 6 परिमंडळे असून त्यापैकी टी विभाग हा परिमंडळ-6 मध्ये येतो. परिमंडळ-6 च्या उपआयुक्तांचे कार्यालय एन विभाग कार्यालयातील इमारतीमधील तिस-या मजल्यावर स्थित आहे.

नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उप आयुक्तांकडे दर महिन्याच्या तिस-या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. सदर दिवशी उप आयुक्त नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचे निवारण करण्याच्या दृष्टीने सहाय्यक आयुक्त/खाते पुमुखांना सूचना करतात.

विभाग कार्यालयातील विकास व परिरक्षण कामाच्या तांत्रिक बाबींवर पर्यवेक्षण व पडताळणीसाठी कार्यकारी अभियंता यांचे पद असून `टी विभागातील वर नमूद केल्याप्रमाणे कार्यभार साभाळतात. त्यांचे कार्यालय `टी विभाग कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर स्थित आहे.

विभाग कार्यालयात प्रमुख लेखापालांच्या अधिपत्याखालील लेखाअधिकारी मुख्य लिपिक, लिपिक व लेखापरिक्षक या कर्मचारीवृंदासह कार्यरत आहेत. टी विभागातील आस्थापनेविषयक बाबी, प्रस्तावांची दायित्व नोंदणी, महसूलाचे लेखापरिक्षण, सर्व प्रकारच्या देयकांची मंजूरी इ. कामे त्यांचे मार्फत केली जातात.

भारतीय राज्य घटनेच्या 74 व्या दुरुस्तीनुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 मध्ये सुधारणा करुन कलम 50 टी अन्वये, माहे जानेवारी 2000 मध्ये 16 प्रभाग समित्यांची स्थापना करण्यात आली. टी विभाग प्रभाग समितीचे कार्यालय टी विभाग कार्यालय इमारतीमधील पहिल्या मजल्यावर स्थित आहे. सदर टी विभाग निवडणूक प्रभागातील 6 नगरसेवक सदर समितीचे सदस्य असून 2012 – 2013 सालाकरिता नगरसेवक श्री. अनिश आटगांवकर हे प्रभाग समिती अध्यक्ष आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.30.07.04 च्या आदेशान्वये बृहन्मुंबईत फेरीवाला/विनाफेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी करण्यासाठी अतिरीक्त दोन त्रिसदस्यीय समित्या नेमण्यात आल्या. त्यापैकी परि. 5 व 6 करिता जी समिती नेमण्यात आली तिचे कार्यालय एन विभाग कार्यालय इमारतीच्या तळ मजल्यावर स्थित आहे.

----

सहाय्यक आयुक्त

| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
|---|---|---|---|---|
| सहाय्यक अभियंता (परिरक्षण)-1 | सहाय्यक अभियंता (परिरक्षण)-2 | सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) | कार्यालय अधिक्षक | तक्रार निवारण अधिकारी |

| (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |
|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक अभियंता (जलकामे) | वैद्यकिय अधिकारी (आरोग्य) | वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) | वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमणे) | वरिष्ठ निरीक्षक (दुकाने व आस्थापना) | कीट नियंत्रण अधिकारी |

| (12) | (13) | (14) | (15) | (16) | (17) |
|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक अभियंता (घकव्य) | सहाय्यक कर निर्धारक व संकलक | प्रशासकिय अधिकारी (शाळा) | वसाहत अधिकारी | सहाय्यक विधी अधिकारी | सहाय्यक सुरक्षा अधिकारी |

तळटीप -(1)- उपरोक्त सर्व खात्यांचा पदनिहाय वृक्ष (तक्ता) स्वतंत्ररित्या जोडला आहे.

(2)- विभागीय पातळीवर कामकाजाच्यासोयीसाठी झालेल्या विकेंद्रीकरणानुसार उपरोक्त अनुक्रमांक 7 ते 18 वर नमूद केलेले खातेप्रमुख सहाय्यक आयुक्तांच्या अधिपत्याखाली कार्यरत असले तरी त्यांच्या खात्यासंबंधीच्या धोरणात्मक बाबींसाठी तसेच माहितीच्या अधिकाराअंतर्गत ते त्या-त्या खात्याच्या प्रमुख अधिका-यांच्या अधिपत्याखाली कामकाज करतात.

सदर खातेप्रमुखांचे प्रमुख अधिकारी पुढीलप्रमाणे आहेत.

सहाय्यक अभियंता (जलकामे) – जलअभियंता

सहाय्यक अभियंता (पर्यावरण)-प्रमुख अभियंता(घनकचरा व्यवस्थापन)

वैद्यकिय अधिकारी आरोग्य – आरोग्य अधिकारी

वरिष्ठ निरीक्षक(अनुज्ञापन) – अनुज्ञापन अधिक्षक

वरिष्ठ निरीक्षक(अतिक्रमण) – अनुज्ञापन अधिक्षक

वरिष्ठ निरीक्षक(दुकाने व आस्थापना) – प्रमुख निरीक्षक(दुकाने व आस्थापना)

किट नियंत्रण अधिकारी – किटकनाशक अधिकारी

सहाय्यक करनिर्धारक व संकलक – करनिर्धारक व संकलक

प्रशासकिय अधिकारी (शाळा) – शिक्षण अधिकारी

सहाय्यक सुरक्षा अधिकारी – प्रमुख सुरक्षा अधिकारी

सहाय्यक अभियंता (घकव्य)

↓

| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
|---|---|---|---|
| सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) | दुय्यम अभियंता (घकव्य) | दुय्यम अभियंता (विद्युत) | कार्यालय अधिक्षक (घकव्य) |
| ↓ | | ↓ | ↓ |
| पर्यवेक्षक | | इलेक्ट्रीशीयन | मुख्य लिपिक (आ.) व (से.अ.) |
| ↓ | | ↓ | ↓ |
| कनिष्ठ अवेक्षक | | कामगार | लिपिक |
| ↓ | | ↓ | ↓ |
| मुकादम | | उद्वाहन चालक | संदेश वाहक |
| ↓ | | | |
| कामगार | | | |